बीड । शनिवार
२४.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ५३
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# बीडमध्ये पुन्हा खळबळ ! पवनचक्की कंपनीच्या बाहेर गोळीबाराचा थरार ! एकाचा मृत्यू

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या लिंबागणेशच्या महाजनवाडी परिसरात गुरुवारी रात्री पवनचक्की कंपनीच्या परिसरात चोरीसाठी आलेल्या चोरट्यांवर सुरक्षारक्षकाने गोळीबार केल्याची घटना घडली आहे. यात एकाचा मृतदेह परिसरात आढळला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून, नेकनूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आहे.







लिंबागणेश परिसरातील महाजनवाडी येथील एका खासगी पवनचक्की कंपनीच्या मालकीच्या साहित्याची चोरी करण्यासाठी काही अज्ञात चोरटे रात्रीच्या सुमारास घटनास्थळी दाखल झाले होते. सुरक्षारक्षकाने त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवल्यानंतर त्यांनी चोरी करण्याचा प्रयत्न करताच, त्याने इशारा देऊन चोरट्यांच्या दिशेने गोळीबार केला. गोळीबार झाल्यानंतर चोरटे घाबरून पळून गेले. तर यात एकाचा मृतदेह सापडला आहे. घटनेची माहिती मिळताच नेकनूर पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून, परिसराची पाहणी करून अधिक तपास सुरू केला आहे. दिव्यांग ग्रामसेवकाला मारहाण, व्हिडिओ व्हायरल चिखली तालुक्यातील असोला बु येथे पंतप्रधान आवास योजनेचा ▶▶ उर्वरित पान २ वर

## दुर्दैवी घटना वगळल्या तर बीड जिल्हा चांगल्या गोष्टीनेच प्रसिद्ध आहे- माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा कलाकारांची भूमी असून या जिल्ह्यात अनेक नामवंत व्यक्तींनी आपल्या कार्यातून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवलेला आहे काही दुर्दैवी घटना वगळल्या तर बीड जिल्हा चांगल्या गोष्टीने देखील प्रसिद्ध आहे. कचरवाडी सारख्या डोंगर कुशीत जन्मलेल्या एका तरुणाने चित्रपट क्षेत्रात भरभरून यश मिळवले असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.



बीड जिल्ह्यातील कचरवाडी येथील रहिवासी असलेल्या डॉ.महेशकुमार वनवे यांच्या वामा लढाई सन्मानाची या चित्रपटाचे उद्घाटन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते तनिष्का चित्रपटगृहात करण्यात आले. यावेळी आ.विजयराजे पंडित, माजी आ.बदामराव पंडित, ॲड. उषाताई दराडे, सुभाष सारडा, अनिल जगताप, विनोद मुळूक, ज्योतीताई मेटे, अरुण डाके, विलास बडगे, सुधाकर मिसाळ, नितीन धांडे, संगीता धसे, नवनाथ शिराळे, अभय कोटेचा, गौतम खटोड, शुभम धूत, सुहास पाटील आदींची उपस्थिती होती. यावेळी ज्ञानेश्वर वनवे आणि लोकाशाच्या वतीने माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोकाशाचे संपादक विजय बंब यांनी केले तर डॉ.महेशकुमार वनवे यांनी मनोगत व्यक्त करताना आतापर्यंत भोजपुरी सिनेमात काम केले पण मराठी चित्रपट म्हणून आज प्रथमच पदार्पण करत आहे. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे खूप मोठे सहकार्य मला लाभले असून मी मुंबईत गेलो तेव्हा तिथे अण्णांनीच मला आधार दिला माझ्या या यशाच्या मागे माझ्या घरातून पाठबळ असून यापुढे मराठी चित्रपट निर्मितीवर आपला भर असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, शुक्रवारी वामा लढाई सन्मानाची हा चित्रपट रिलीज झाला आहे राज्यात एकाच वेळी शेकडो थिएटर ▶▶ उर्वरित पान २ वर

## पहिल्या पावसात बीड स्थानकाची दुर्दशा

### प्रवाशांचे हाल, बस नेताना चालकांची तारेवरची कसरत ; आगार प्रशासनाच्या डोळ्यांवर मात्र पट्टी



**बीड । प्रतिनिधी**

मागील दीड वर्षांपासून अतिशय संथ गतीने सुरू असलेले मुख्य बसस्थानकाचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे. परंतु, पर्यायी उभारण्यात आलेल्या बसस्थानकावर प्रवाशांना अक्षरशः चिखल तुडवत प्रवास करावा लागत आहे. मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे बसस्थानक परिसर चिखलमय झाला असून, महिलांपासून वृद्धांपर्यंत सर्व प्रवाशांना प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. शहरातील बसस्थानक इमारत कालबाह्य झाल्याने ती पाडून तिच्या जागी नवीन ▶▶ उर्वरित पान २ वर

**● शहरातील बीड बसस्थानकामधून प्रवास करणे म्हणजे एक प्रकारचे दिव्यच आहे. याठिकाणी कुठलीच सुविधा नाहीये. आता तर पावसामुळे सर्वत्र चिखल झाला आहे. यामध्ये लहान मुले, महिला, वृद्ध यांचे फार हाल होतात. शिवाय याठिकाणी डासांचेही प्रमाण वाढले आहे. त्यामुळे प्रवासी त्रस्त आहेत. – जे. सय्यद प्रवासी,बीड**

## अवकाळी पावसाने मोठे नुकसान

### पंचनामे करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे यंत्रणेला आदेश



**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात सध्या अवकाळी पाऊस तांडव करत आहे, या पावसामुळे जिल्ह्यातील उन्हाळी पिकांबरोबरच फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे, जिल्ह्यातील या परिस्थितीची जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तातडीने दखल घेतली आहे, त्यानुसार जिल्ह्यातील नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या संबंधित यंत्रणेला दिले आहे आहेत. नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांप्रती राज्य शासन संवेदनशील आहे. एप्रिल व मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेत पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी. यासाठी शेत पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. पंचनामे करण्यासाठी महसूल व कृषी विभागाने पथके गठीत करून ही कार्यवाही गतीने पूर्ण करावी असे निर्देश सरकारच्या वतीने देण्यात आलेले आहेत, पूर, ▶▶ उर्वरित पान २ वर

## कोकण किनारपट्टीवर काळ्याकुट्ट ढगांची गर्दी, अरबी समुद्र खवळणार; अतिवृष्टीचा रेड अलर्ट

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून मान्सूनपूर्व पावसानं जोरदार हजेरी लावत सर्वत्र एकच दाणादाण उडवली आहे. एकाएक वातावरणातील बदलामुळे राज्यातील बहुतांश ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि मध्यम ते दमदार पावसाच्या सरींने हजेरी लावली आहे. मात्र या पावसामुळे शेतकऱ्यांचे ही मोठे नुकसान झाले आहे. मात्र ठिकठिकाणी झालेल्या पावसामुळे राज्यातील कमाल तापमानाचा पारा चांगलाच खाली आला आहे. अशातच (२४ मे २०२५)देखील कोकण किनारपट्टीसह मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात सध्या पावसाचे ढग आहेत. तर कोकण किनारपट्टीवर अतिवृष्टीचा रेड अलर्ट हवामान विभागाने दिला आहे. तर दुसरीकडे, अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी ▶▶ उर्वरित पान २ वर



## बीडमध्ये आज भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन

### तिरंगा रॅलीत महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजयजी शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती लाभणार!

**बीड । प्रतिनिधी**

सीमेपलीकडून वारंवार होणाऱ्या भ्याड हल्ल्यांना भारतीय सैन्याने दिलेले रोकठोक प्रत्युत्तर हे केवळ युद्धाचे नव्हे तर भारतमातेच्या वीर पुत्रांची शौर्यगाथा लिहिणारे आहे. या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी आणि मातृभूमीसाठी बलिदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी बीड शहरात आज दि. २४ मे २०२५ रोजी सकाळी १०. ०० वाजता देशभक्तीने ओथंबलेली भव्य तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली असून या ऐतिहासिक रॅलीस महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा. संजयजी शिरसाट यांची ▶▶ उर्वरित पान २ वर



### ● शूरवीर सैनिकांसाठी, चला एक होऊ देशासाठी– जगताप, मुळूक, गलधर

**देशाच्या मातीसाठी, आपल्या लेकरांसाठी, आपल्या भविष्यासाठी शूरवीर जवान आपल्या प्राणांची आहुती देतात. त्या शूरवीरांना आपण एक सुजाण भारतीय नागरिक असल्या नात्याने एकत्रित येऊन वंदन करायला हवे. ही तिरंगा रॅली आपल्या सैनिकांच्या बलिदानाचे स्मरण आणि त्यांच्या शौर्याची गाथा गाण्याचा एक पवित्र क्षण असणार आहे. यामुळे बीडवासियांनी जास्तीतजास्त संख्येने तिरंगा रॅलीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांनी तमाम बीडवासियांना केले आहे.**

## ड्रोन बंदीवर फेरविचार करावा

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने सर्व प्रकारचे ड्रोन बंदी केल्याने जे शेतकरी फवारणी साठी ड्रोन चा वापर करीत आहेत ते अडचणीत सापडले असल्याने या बंदी चा केवळ शेतीसाठी फेरविचार करावा अशी विनंती कामगार नेते राजकुमार घायाळ यांनी जिल्हा प्रशासनास भेटून केली याबाबत अधिक माहिती देताना असे सांगितले की जिल्ह्यातील अनेक शेतकरी यांनी फळबागासाठी मृग बहार घेण्यासाठी झाडे ताणावर सोडली मात्र अचानक आलेल्या पुर्व मोसमी पावसाने झाडाला ताण न बसता ताण तुटल्याने फळझाडाना तातडीने फवारणी करणे अवश्यक आहे करीता ड्रोन ने केलेली फवारणी प्रभावी होते असे तज्ञ सल्ला देतात पण ड्रोण बंदी घातली असल्याने शेतक–याची अडचण झाल्याने प्रशासनाने बंदी चा फेरविचार करावा अशी विनंती केली.



# मतदारांसाठी मतदान केंद्राबाहेर मोबाईल ठेवण्याची सुविधा देणार : भारत निवडणूक आयोग

मतदारांच्या सोयीसाठी आणि मतदान दिवशीच्या व्यवस्थापनात सुधारणा करण्याच्या उद्देशाने, भारत निवडणूक आयोगाने मतदान केंद्राच्या बाहेर मोबाईल ठेवण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे तसेच, प्रचारासाठीची मर्यादा देखील नव्याने निश्चित करण्यात आली असल्याचे जाहीर केले आहे. हे निर्णय लोकप्रतिनिधी अधिनियम, १९५१ आणि निवडणूक आचारसंहिता, १९६१ यांच्याशी सुसंगत आहेत.

ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये मोबाईल फोनचा वाढता वापर लक्षात घेता, तसेच वृद्ध, महिला आणि दिव्यांग मतदारांना येणाऱ्या अडचणींचा विचार करता, आयोगाने मतदान केंद्राच्या बाहेरच मोबाईल ठेवण्याची सुविधा देण्याचा निर्णय घेतला आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या आत केवळ बंद अवस्थेतील मोबाईल्स नेण्यास परवानगी राहील. प्रवेशद्वाराजवळ मोबाईल ठेवण्याची ही सुविधा दिली जाणार असून, मतदारांना मतदान केंद्रात मोबाईल घेऊन जाण्यास परवानगी दिली जाणार नाही. मात्र, काही ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी याला अपवाद देऊ शकतात. मतदान गुप्ततेचा नियम (नियम ४९ एम) यापुढेही काटेकोरपणे पाळला जाणार आहे.

प्रचाराच्या संदर्भातही महत्त्वाचा बदल करण्यात आला असून, मतदान केंद्राच्या १०० मीटर अंतराच्या आत प्रचारास मनाई करण्यात आली आहे. मतदान दिवशी उमेदवारांनी मतदारांसाठी अनौपचारिक ओळखपत्र (तखड नसल्यास) देण्यासाठी ठेवलेले मदत बूथ हे आता मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या पलीकडे ठेवावे लागणार आहेत.

भारत निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त डॉ.सुखबीर सिंग संधू व डॉ.विवेक जोशी यांच्या नेतृत्वाखाली, भारत निवडणूक आयोग मतदान प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत पार पाडण्याबरोबरच मतदारांसाठी सुविधा सुधारण्यासाठी सातत्याने नवकल्पना राबवत असल्याचे भारत निवडणूक आयोगाने कळविले आहे.

पान १ वरून पुढे...

## बीडमध्ये पुन्हा...

सर्व्हे करणाऱ्या दिव्यांग ग्रामसेवक संतोष सवडतकर यांना मारहाण झाल्याची घटना २२ मे रोजी सकाळी घडली. आरोपी जाफर खा आमद खा याने सवडतकर यांच्या मोटारसायकलला धक्का देऊन खाली पाडले, शिवीगाळ केली आणि कॉलर पकडून गल्लीत लोटले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, ग्रामसेवक संघटनेने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. सवडतकर हे गावातील अपात्र घरकुल लाभार्थ्यांचे पंतप्रधान आवास योजनेचे सर्वेक्षण करत होते. यापूर्वी गावातील घाण पाण्याच्या तक्रारीवरून झालेल्या चौकशीमुळे आरोपीचा राग असल्याचे तक्रारीत नमूद आहे. मारहाणीची तक्रार अंढेरा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष भगवान डोंगरदिवे यांनी सवडतकर यांना पोलिस ठाण्यात नेले. आरोपीविरुद्ध बीएनएस कलम १३२,११५(२), आणि ३५१ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

बीड जिल्ह्यातील नाळवाडी ग्रामपंचायतीमध्ये विविध शेती काम ासाठी आलेल्या ग्रामस्थांकडून पैशाची मागणी केल्याचा व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओत नागरिकाला अधिकारी सरळ सरळ सांगितले की, पैसे उसने घ्या, पण आम्हाला द्या, असा दबाव शेतकऱ्यांवर आणण्यात आला. हा प्रकार म्हणजे ग्रामपंचायतीच्या कामकाजात पारदर्शकतेचा अभाव आणि अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराचे उदाहरण आहे. सरकारी पातळीवर निधी उपलब्ध असतानाही, गावकऱ्यांकडून व्यक्तिगत स्वरूपात पैसे मागितले जात असल्याचे उघड झाले आहे.

संतप्त शेतकऱ्यांनी ग्रामसेवकाचा व्हिडिओ तयार करून प्रशासकीय कामकाजाचा बुरखा फाडला आहे. पैसे घेणाऱ्या ग्रामसेवकाचे नाव शकील सय्यद असे आहे. दरम्यान ग्रामसेवकाची बाजू जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांचा संपर्क होऊ शकला नाही. ग्रामसेवक पैसे घेतानाचा व्हिडिओ आता सोशल माध्यमात तेजीने व्हायरल झाला आहे.

## दुर्दैवी घटना...

मधून हा चित्रपट रिलीज होतोय ही लोकांच्या शुभेच्छांची मोहर आहे. महेश वनवे यांनी जेव्हा मुंबईत प्रवेश केला तेव्हाच मी म्हणालो होतो काळजी करू नकोस, कचरवाडीच्या डोंगर रांगेच्या कुशीत जन्मलेल्या महेश याने कॅलिफोर्निया पर्यंत मजल मारली आहे. भोजपुरी लोकांचा पसंतीचा हिरो म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते दुर्दैवाने माणुसकीला काळीमा लागेल अशा घटना घडत आहेत पण बीड जिल्हा चांगल्या गोष्टीने कितीतरी पटीने पुढे आहे. विजय बंब सारखे पडद्यामागचे कलाकार पाठीशी आहेत बीड जिल्हा विविधतेने नटलेला जिल्हा आहे, स्त्री-पुरुष हा भेद आता राहिला नाही वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा याप्रमाणे पंढरीच्या विठ्ठलाने देखील स्वतः आपल्या बाजूला रखुमाईला उभे केले आहे. म्हणजेच भक्ती आणि शक्ती सोबत घेऊनच त्यांनी भक्तांचा सागर आपल्याकडे वळवला आहे. स्त्री शक्तीचा अनुभव म्हणून सुनीता विल्यम सारखी भारतीय वंशाची अंतराळवीर नऊ दिवसासांठी अंतराळ स्थानकावर गेली होती परंतु नऊ महिने संघर्ष करून तिने पृथ्वीवर प्रवेश केला यावरूनच स्त्रीशक्तीचा अंदाज आपण लक्षात घ्यायला हवा. या चित्रपटाचे कथानक स्त्री शक्तीवर अवलंबून असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आव्हान त्यांनी केले. यावेळी चित्रपट रिलीज झाल्यानंतर माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी देखील अर्धा तास चित्रपटाचे परीक्षण केले.

## पहिल्या पावसात...

इमारत बांधण्याचे काम मागील दीड वर्षापासून सुरू आहे. परंतु, जिल्ह्याचे ठिकाण असल्यामुळे बीड बसस्थानकावर प्रवाशांची प्रचंड गर्दी असते. दिवसभरात एक हजारांपेक्षा जास्त बस फेऱ्या या बसस्थानकावर होतात. मात्र, अतिशय संथ गतीने सुरू असलेले नवीन बसस्थानकाचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे. मात्र, या कामामुळे तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात आलेल्या पर्यायी बसस्थानकावर प्रवाशांना मात्र मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे या पर्यायी बसस्थानक परिसरात सर्वत्र चिखल आणि साचलेल्या पाण्यामुळे बसमध्ये चढणे, उतरणे आणि बसपर्यंत पोहोचणे मोठ्या त्रासाचे ठरत आहे. महिला, वृद्ध, विद्यार्थी आणि लहान मुलांना चिखल तुडवत बसपर्यंत पोचावे लागत आहे. कोणतीही सुसज्ज व्यवस्था नाही, या तात्पुरत्या बसस्थानकात कुठे बस उभी राहील? याचा पत्ता लागत नाही. ना मार्गदर्शक फलक, ना सूचना फलक, ना वेळापत्रक. प्रवासी गोंधळून जातात, चुकीच्या बसकडे जातात तर अनेकदा बस निघून गेलेली देखील प्रवाशांच्या लक्षात येत नाही. त्यामुळे बस आली की प्रवाशांना चिखल तुडवित धाव घेतच बस गाठावी लागत आहे. त्यामुळे बसमध्ये चढताना पाय घसरून पडण्याच्या अनेक घटना घडत आहेत. सध्या सुरू असलेले बसस्थानकाचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे प्रशासन सांगत आहे. मात्र, प्रत्यक्षात कामाची गती संथ आहे. त्यामुळे पावसाळा सुरू होण्यापूर्वी हे बसस्थानक प्रवाशांसाठी खुले करावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. मात्र, कंत्राटदाराच्या कामाची गती आणि प्रशासनाचे दुर्लक्ष पाहता ते शक्य होणार का? हा प्रश्न आहे.

## अवकाळी पावसाने...

अवेळी पाऊस, दुष्काळ, वादळी वारा व गारपीट या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यास शासन नेहमीच प्राधान्य देत आहे. विविध नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीपोटी सन २०२३- २०२४ या वर्षात ५४ लाख ८० हजार पात्र शेतकऱ्यांना ४ हजार ८३३ कोटी (चार हजार आठशे तेहतीस कोटी) रूपये तर २०२४- २०२५ या आर्थिक वर्षात ६९ लाख ३ हजार शेतकऱ्यांना ६ हजार ९८९ कोटी (सहा हजार नऊशे एकोणनव्वद) आणि १ एप्रिल २०२५ ते आतापर्यंत ९ लाख ७ हजार शेतकऱ्यांना ९७५ कोटी रुपयांची मदत देण्यात आली असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी म्हटले आहे. वास्तविक पाहता बीड जिल्ह्यातही अवकाळी पावसाने सध्या चांगलाच धुमाकूळ घातलेला आहे, या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे, या अनुषंगाने आता जिल्ह्यातील नुकसानीचे तातडीने पंचनामे करावे असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आपल्या यंत्रणेला दिले आहेत. या आदेशानुसार जिल्ह्यातली यंत्रणा कामाला लागली आहे.

## कोकण किनारपट्टीवर...

दाबाच्या क्षेत्राचा प्रभाव वाढणार असल्याने, कोकण किनारपट्टीवर अतिवृष्टीचा रेड अलर्ट हवामान विभागाने दिला आहे. सिंधुदुर्गात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या पर्जन्यमानाप्रमाणेच पुढील दोन दिवसही धुवाधार पाऊस बरसण्याचा इशारा वेधशाळेकडून देण्यात आला आहे. दरम्यान मच्छीमारांनी समुद्र किनारपट्टीवर मासेमारी करता जाऊ नये, असे आवाहन देखील करण्यात आले आहे. तर दुसरीकडे कोकण किनारपट्टी लगत ताशी ४५ ते ६० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. मान्सून पूर्व पावसामुळे जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. या पावसामुळे नदी-नालेही प्रवाहित झाले आहेत. जिल्ह्यात सध्या मध्यम स्वरूपाचा पाऊस कोसळत आहे.

सातारा जिल्ह्यात पावसाची रिप रिप सुरूच!

सातारा जिल्ह्यात अद्याप पावसाची रिप रिप सुरूच आहे. त्यामुळे जिल्ह्यातील घाटरस्ते आता धोकादायक बनू लागले आहेत. साताराकडून कास पठारकडे जाणाऱ्या रस्त्यावर रात्री उशिरा दरड कोसळली आहे. रात्री उशिरा ही दरड कोसळल्याने अद्याप या ठिकाणी प्रशासन पोहोचू शकले नाहीये. सध्या या ठिकाणी एकेरी वाहतूक सुरू असून वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या घाटातून मोठ्या प्रमाणात पर्यटकांची वर्दळ सुरू असते. तर कास, बामणोली तसेच अनेक गावानं जाण्यासाठी हा मुख्य रस्ता असल्याने पर्यटक आणि प्रवासी या मार्गाचा सर्रास वापर करत असतात. त्यामुळे आता घाट माथ्यावरून प्रवास करताना वाहन धारकांना सतर्क राहावे लागणार आहे.

तीन दिवसात उजनी धरणाच्या पाणी साठ्यात पावणेदोन टीएमसीने वाढ

पुणे, सोलापूर आणि अहिल्यानगरसाठी जीवनदायीनी ठरलेल्या उजनी धरणाच्या पाणी पातळीमध्ये पावसाच्या पाण्यामुळे वाढ झाली आहे. गेल्या तीन दिवसात उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाची संततधार राहिलेली आहे. आणि यामुळे गेल्या तीन दिवसात उजनी धरणाच्या पाणी पातळीमध्ये १ पूर्णांक ८९ टीएमसी इतका पाणीसाठा वाढला आहे. सध्या उजनी धरणामध्ये एकूण ५३ पूर्णांक २५ टीएमसी इतका पाणीसाठा आहे. उजनी धरण हे आजच्या स्थितीला मायनस १९ पूर्णांक ४३ टक्के इतका आहे. मायनस मध्ये असलेलं उजनी धरण प्लस मध्ये येण्यासाठी आणखी १० पूर्णांक ४१ टीएमसी इतकी पाण्याची आवश्यकता आहे.

## बीडमध्ये आज...

प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ही रॅली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून सुरू होईल. त्यानंतर सुभाष रोड मार्गे जात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ अभिवादन करण्यात येणार आहे. शेवटी सीमारेषेवर मातृभूमीसाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना सामूहिक श्रद्धांजली वाहून रॅलीचा समारोप होईल. या रॅलीमध्ये हजारो तरुण मोटारसायकलवर तिरंगा झेंडा हाती घेऊन सहभागी होणार आहेत. हे आयोजन केवळ एक कार्यक्रम नसून, जवानांच्या शौर्याला मानवंदना देणारी आणि एकतेची भावना जागवणारी लोकचळवळ ठरणार आहे.

पान ४ वरून पुढे...

## 'अँग्रिस्टॅक' अंतर्गत ...

करण्यात आला असून 'अँग्रिस्टॅक' अंतर्गतच पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी सुद्धा फार्मर आयडी बंधनकारक करण्यात आला आहे .पीएम किसान योजनेंतर्गत पात्र सर्व लाभार्थी यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी 'अँग्रिस्टॅक अंतर्गत नोंदणी गरजेची आहे. तरी शेतकऱ्यांनी विनाविलंब 'अँग्रिस्टॅक नोंदणी करून घ्यावी जेणेकरून कोणताही पात्र शेतकरी पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यापासून वंचित राहणार नाही, असे आवाहन जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी केले आहे.

## मराठवाड्यात 'सस्ती...

त्यांचे समुपदेशन करून , रस्त्याची गरज पटवून देणे व सामोपचाराने शेत रस्ता , पानंद रस्ता , शिवरस्ता मोकळा करून देणे . यासाठी कमीत कमी खर्च येईल व कमीत कमी वेळ लागेल हा या योजनेमागचा मूळ उद्देश आहे. मुळात मराठवाड्यातील शेतकरी गरीब आहे . नेमकी हीच बाब विभागीय आयुक्तांनी हेरली . शेतकऱ्यांना कमी खर्चात आणि कमी वेळेत रस्ते देण्याची ही अभिनव संकल्पना त्यांनी अमलात आणून यशस्वी करून दाखवली . अशाप्रकारे राज्यात सर्वत्र सस्ती अदालत सारखी योजना राबवली तर शेतकऱ्यांचे रस्त्याचे प्रश्न जागेवर आणि लवकरात लवकर निकाली निघण्यास निश्चितपणे मदत होईल .

बीड तालुक्यातही शुक्रवारी सात रस्त्याबाबत निर्णय घेण्यात आला . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , निवासी नायब तहसीलदार सुहास हजारे यांनी उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या समवेत तहसील कार्यालयात सात प्रकरणात निकाल दिला. असाच एक रस्ता तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी सौ शीतल चाटे , मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे , ग्राम महसूल अधिकारी /तलाठी लक्ष्मण ओव्हळ , अमोल अधापुरे , कोतवाल बाबासाहेब बिरलिंगे यांच्यामार्फत सावरगाव घाट येथे मोकळा करण्यात आला.

अर्जदार गणेश देशमुख यांच्या अर्जावरून गैर अर्जदार श्री खाकरे व इतर यांच्या समक्ष खडकी घाट - सावरगाव घाट शिवरस्ता जो की खडकी घाटच्या स्वाती मदन शिरसट व सावरगाव घाट मधील शेतकरी यांचे पोल्ट्री फार्म दरम्यान आहे तो शिवरस्ता अतिक्रमीत होता , तो मंडळ अधिकारी यांच्या समज देण्यावरून व शेतकऱ्यांशी चर्चामसलत करून सामंजस्याने मोकळा करण्याचे ठरवण्यात आले . अल्पभूधारक शेतकरी , पिचलेले शेतकरी यांच्या भल्यासाठी बीडचे महसूल प्रशासन राबत असल्याने सर्वसामान्य शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केलेले आहे.

एकंदरीतच मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांची सस्ती अदालत योजना ज्यामुळे स्वस्तात व लवकरात रस्ते होऊ लागले ती अभिनव व खरोखरच कौतुकास्पद आहे .

## शेतकऱ्यांची खते...

कृषी विभागाच्या साह्याने काही कृषी सेवा केंद्र कृत्रिम टंचाई निमर्ाण करून चढ्या दराने विक्री करून शेतकऱ्यांना लुटण्याच्या तयारीत असल्याचे दिसत आहे, पण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हे होऊ देणार नसुन, कृषी विभागाने यावर तात्काळ कागदी घोडे न नाचवता उपाययोजना करावी व शेतकऱ्यांची लिंकिंग द्वारे होणारी लूट थांबवावी, अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करू असा इशारा जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी दिला आहे.

## शैक्षणीक व्हीडीओ...

सहभागी झाले होते .या स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचोटी येथील शिक्षक श्री धनवे बापू यांनी वर्ग सहावी व आठवी विषय इंग्रजी या विषयातील इंग्रजी व्याकरण वर आधारित व्हिडिओ निर्मिती केली होती या स्पर्धेमध्ये त्यांचा तालुक्यातून प्रथम क्रमांक आल्याबद्दल त्यांचा नुकताच अंबाजोगाई येथे सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला याप्रसंगी डॉक्टर विक्रम सारख साहेब,डॉक्टर योगेश सुरवसे तसेच मुख्याध्यापका श्रीमती पाठक मॅडम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .

याबद्दल त्यांचे वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गट शिक्षणाधिकारी श्री बाबासाहेब उजगरे पिंपरखेड केंद्राचे केंद्रप्रमुख श्री धाईतिडक सर केंद्रीय मुख्याध्यापक श्री दत्तात्रय कदम चिंचोटी शाळेचे मुख्याध्यापक श्री नांदे सर तसेच सर्व शिक्षक मुख्याध्यापक शालेय व्यावस्थापण समीती चिंचोटी तसेच मित्रपरिवार या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले .

## भोगवटा धारकांना...

राजकिशोर मोदी यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

वरील मागणीसाठी सादर केलेल्या निवेदनामध्येअंबाजोगाई नगर परिषद हद्दीतील असणाऱ्या लोक वस्त्यामधील अतिक्रमण धारकांच्या घरांच्या नोंदी भोगवटयामध्ये आहेत. ज्यामध्ये क्रांती नगर, लाल नगर, कबीर नगर, रायगड नगर, सिद्धार्थ नगर, मिलिंद नगर, गांधी नगर ,बोधी घाट, पेन्शन पुरा, सदर बाजार, समता नगर, भीम नगर, दमदम पुरा, शाह बट्टा, गवळी पुरा या अशा इतर वस्त्या गेल्या अनेक वर्षापासून वसलेल्या आहेत. तेथे हजारो कुटुंब आपल्या कुटुंबियांसह वास्तव करत आहेत.

२००९ साली महाराष्ट्र शासनाने परिपत्रक काढून सदरच्या अतिक्रमण धारकांच्या भोगवट्यातील नोंदी मालकीत घ्याव्यात असा स्पष्ट उल्लेख केला आहे. मात्र भूमी अभिलेख खात्याच्या धोरणामुळे आजपर्यंत यात यश मिळू शकले नाही. मात्र याच परिपत्रकाच्या आधारे गेवराई नगर परिषदेने भोगवटा धारकांना मालकीच्या पीटीआर दिल्या आहेत.

त्याच पध्दतीने अंबाजोगाई नगर परिषदेने देखील येथील हजारो भोगवटा धारकांना त्यांच्या मालकीच्या जागेत घेऊन त्यांना त्यांच्या मालकीच्या पी टी आर द्याव्यात जेणे करून त्यांना शासनाच्या पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास घरकुल योजना व अन्य शासकीय योजनांचा लाभ घेता येईल अशी मागणी अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. या निवेदनावर राजकिशोर मोदी, आदमाने महादेव , खालेद चाउस, गणेश मसणे, सुनील वाघाळकर, खयामोद्दीन काझी, किशोर परदेशी,कमलाकर हेडे, धम्मा सरवदे, दत्ता सरवदे, आकाश कऱ्हाड, गोविंद पोतंगले, रफीक गवळी, असलम शेख, शरद काळे,अकबर पठाण, मुन्ना वेडे, दत्ता हिरवे,संतोष चिमणे,अक्षय परदेशी आशिष ढेले, तौसिफ सिद्दीकी, यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जिजाऊ माँसाहेब...

ठेवीदारांना पुर्ण न्याय देण्यासाठी तातडीने संचालकांच्या मालमत्तेचा शोध घेवून जप्तीची कारवाई करण्यासाठी पोलीसांनी सहकार्य करावे. अशी विनंती संघर्ष कृती समितीच्या वतीने शेख कुतुब भाई, सखाराम कळासे, डॉ अरविंद काकडे, लक्ष्मण हाटवटे, भाऊसाहेब परसे, बांगर ताई, सूर्यभान नवले आदी ठेवीदारांनी केली आहे.ऑगस्ट २०२३ मध्ये मार्गदर्शक अशोकराव हिंगे, यांच्या नेतृत्वाखाली ठेवीदारांच्या शिष्टमंडळाने दिल्ली येथे मुख्य रजिस्टार भारत सरकार यांची भेट घेऊन अवसायकाची मागणी करणारा प्रस्ताव दाखल केला होता.कृती समितीच्या इंजि. सखाराम कळासे यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला. तसेच खा.बजरंग बाप्पा सोनवणे , खा.सुप्रियताई सुळे यांनी केंद्रीय गृहमंत्रीअमित शहा, सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे पाठपुरावा केला. राज्य सहकार आयुक्त यांच्या शिफारशीनुसार भारत रजिस्टार यांनी माजलगाव तालुका सहाय्यक निबंधक यांची अवसायक म्हणून नेमणूक करून पुढील कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. ठेवीदारांनी खा.बजरंग बाप्पा सोनवणे व खा.सुप्रियाताई यांचे आभार व्यक्त केले आहेत. मध्ये आनंद व्यक्त केला जात आहे. अवसायकाच्या नेमणुकी मुळे ठेवीदाराला न्याय मिळण्याच्या कामी मदत होणार आहे.

## जिल्ह्यातील शेतकरी...

योजनेचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी बंधनकारक आहे. नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांना कसल्याही प्रकारचा लाभ मिळणार नाही याची कटाक्षाने तात्काळ नोंद घेऊन याप्रकरणी तात्काळ फॉर्मर आयडी ओळखपत्र काढणे अत्यावश्यक बाब आहे.

शेतकरी ओळखपत्र काढण्यासाठी (फॉर्मर आयडी) ओळखपत्र काढण्यासाठी आधार कार्ड, मोबाईल क्रमांक, शेतीचा गट नंबर माहित असणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना विनंती की, फार्मर आयडी शेतकरी ओळखपत्र तात्काळ काढणे अत्यंत आवश्यक आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी या पत्राद्वारे पुन्हा केले आहे.

## बीडच्या शिक्षण....

राज्याच्या शिक्षण मंत्र्यांकडं तक्रार केली होती. यावरून प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आणि माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांच्या प्राथमिक चौकशीचे आदेश राज्याच्या शिक्षण विभागानं दिले आहेत.

बोगस शिक्षक भरतीचा होणार भांडाफोड : राज्यात सध्या शिक्षक भरती घोटाळा चर्चेचा विषय बनला आहे. नागपूरमध्ये देखील शिक्षक भरती प्रकरणी चौकशी सुरु झाली आहे. बीड जिल्ह्यातही शिक्षक भरतीमध्ये खासगी शिक्षण संस्था चालक आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी संगनमत करुन कोट्यवधींचा घोटाळा केल्याच्या तक्रारी आहेत. पवित्र पोर्टलमध्ये खेळ करत शिक्षकांना नियुक्त्या देण्यात आल्या आणि त्या नियुक्त्यांना शिक्षण विभागाने मान्यताही दिली अशा तक्रारी आहेत. विशेष म्हणजे यासंदर्भातील कोणतीच माहिती दिली जात नव्हती. एवढंच नाही तर, माहिती अधिकारात देखील माहिती द्यायला शिक्षण विभाग तयार नाही. या संपूर्ण प्रकरणात शेकडो कोटींची उलाढाल झाल्याच्या तक्रारी होत्या. या संदर्भात भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष सादिक इनामदार यांनी राज्याच्या शिक्षण मंत्र्यांकडं तक्रार केली होती. त्यात प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आणि माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांनी ५०० कोटींचा भ्रष्टाचार केल्याचं म्हटलं होतं. यावर शिक्षण मंत्र्यांनी शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना चौकशीचे निर्देश दिले होते. त्यानुसार शिक्षण विभागाने आता राज्याच्या शिक्षण आयुक्तांना या प्रकरणात प्राथमिक चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यातही बोगस शिक्षक भरतीचा भांडाफोड होणार असं सध्या तरी दिसतय.फ

## मिनाक्षीताई देवकते...

आला असून रविवार दिनांक २५ मे २०२५ रोजी सोलापूर येथील निर्मिती लॉन्स नडगिरी पेट्रोल पंपा समोर विजापूर रोड येथे सदरील पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार प्रकाश शेंडगे हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील आयकर आयुक्त डॉ. नितीन वाघमोडे, मुंबईचे आयकर आयुक्त डॉ. सचिन मोटे यांच्यासह संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ड. चिमणभाऊ डांगे, धनगर समाजाचे नेते चेतनभाऊ नरोटे, पुणे येथील सहाय्यक पोलीस आयुक्त सौ. रुक्मिणीताई गलांडे, राम मांडूरके यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तरी या सत्कार सोहळ्यास बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कार्यक्रमाचे निमंत्रक तथा ए. डी. फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक गोरड यांनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# न्याय हक्कासाठी, शेतकऱ्यांचा लोकलढा

## २५ मे पासून तांदळा येथे आमरण उपोषण, १४० गावातील होणार सहभागी

**कोळगाव । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तांदळा येथे अजय पाटील साळुंखे दि.२५ मे रोजी पासून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर आमरण उपोषण करणार असून सुमारे १४० गावातील शेतकरी या आंदोलनात सहभागी होणार आहेत,या आमरण उपोषणाची जनजागृती मोठ्या प्रमाणात होत असून जनजागृती बैठकींना सभेचे स्वरूप प्राप्त होत आहे.




बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागात दरवर्षी पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होती,या दुष्काळी भागातील कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जायकवाडीच्या कालव्यातून उपकालवा करुन दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना पाणी द्यावे,या मागणीसाठी १४० गावातील शेतकऱ्यांनी लोकलढा सुरू केला आहे. अजय पाटील साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली तांदळा येथे दि.२५ मे रोजी पासून आमरण उपोषण करण्यात येणार असून पुढील प्रमाणे उपोषणकर्त्यांची मागणी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड कडे निवेदनाद्वारे केली आहे.१)निवडणुकी वेळी दिलेले शेतकरी कर्ज माफीच्या आश्वासनाची आमलबजावनी करून सरसकट शेतकरयांचा ७/ १२ कोरा करण्यात यावा.

२)नदी जोड प्रकल्प करून धरणात,नदीत, नाल्यात,ओढयात,पाटात पाणी सोडा व ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्या ठिकाणी पाट काढण्यात यावे त्यामुळे कायम स्वरूपी मराठवाडयासह महाराष्ट्रील शेती सिंचणाचा प्रश्न मार्गी लागेल

३) स्वामीनाथन आयोगच्या शिफारशी प्रमाणे शेतीमालाला दिडपट हमीभाव दया व आज पर्यंत शेती मालाला योग्य हमी भाव न दिल्या मुळे शेतकरी वर्गाचे लाखों रूपये सरकारकडे बाकी आहे ते व्याजासह शेतकरी वर्गाच्या बँक खात्यात जमा करण्यात यावे

४)एक रुपयात पिक विमा हि योजना बंद करण्यात येणार आहे ती बंद न करता चालुच ठेवा व पिक विमा चार कव्हरेज रद्द करण्यात येऊ नये.

५) म.ग्रा.रो.ह.योजनेतील मंजुर रस्ते ,शेततळे ,विहिर ,गोठे, वृक्ष लागवड इत्यादी कुशल /अकुशल रककम तात्काळ वितरीत करावी.

६) हिंदु धर्मात पवित्र आसलेली गोमाताची कत्तल आज पर्यंत थांबलेली नाही त्यामुळे गोवंश कायदयात बदल करून कठोर अजामीन पात्र कायदा करण्यात यावा यामुळे दखल पात्र गुन्हा दाखल होईल व गो तस्कर यांना जरब बसेल

७) जायकवाड़ी धरणातुन राष्ट्रीय महामार्ग (छक)६१ च्या बाजुने पाण्याचा पाट काढण्यात यावा त्यामुळे असंख्ये गावातील पिण्याच्या व शेती सिंचणाचा प्रश्न मार्गी लागेल.

८)अमृतेश्वर महादेव मंदिर परिसर मौजे तांदळा शिवारातील दरयात धरण बाधण्यात यावे या मुळे मोठया प्रमाणात परिसरातील गावांचा शेती सिंचण व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल तसेच राष्ट्रीय महामार्ग छक६१ कल्याण विशाका पटणम महामार्गा मध्ये शेतकरी वर्गाचे शेती गेलेली आहे त्या सर्व शेतकरी वर्गाला आर्थिक मोबदला तात्काळ देण्यात यावा.

या उपोषणाची जनजागृती करण्यासाठी सरपंच नवनाथ गवते, सरपंच तुकाराम तळतकर, पत्रकार संतोष भारती, गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष राहुल लोंढे,लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे, अजय मोटे,ओमकार शेंबडे अदी १४० गावात जाऊन आंदोलनांची जनजागृती करत आहेत,या जनजागृती बैठकांना सभेचे स्वरूप प्राप्त होत आहे.

# जागतिक कुस्ती दिवस दरवर्षी 23 मे रोजी साजरा केला जातो : बाजीराव ढाकणे

**बीड । प्रतिनिधी**

हा दिवस २३ मे १९०४ रोजी व्हिएन्ना, ऑस्ट्रिया येथे झालेल्या पहिल्या ग्रीको-रोमन कुस्ती विश्व अजिंक्यपद स्पर्धेच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. जागतिक कुस्ती दिवसाचे महत्त्व- या दिवशी कुस्ती या प्राचीन आणि प्रतिष्ठित खेळाचा जागतिक स्तरावर गौरव केला जातो. कुस्ती ही केवळ शारीरिक ताकद आणि कौशल्याचा खेळ नसून, ती शिस्त, सहनशक्ती, रणनीती आणि परस्पर सन्मान यांसारख्या मूल्यांचे प्रतीक आहे. या दिवशी विविध देशांमध्ये कुस्ती स्पर्धा, कार्यशाळा आणि जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. भारतातील उत्सव- भारतामध्येही



जागतिक कुस्ती दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. उदाहरणार्थ, पुणे येथे २३ मे २०२२ रोजी पारंपरिक मातीच्या आखाड्यात सामूहिक कुस्ती सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

जागतिक कुस्ती महिना- मे महिना संपूर्णपणे 'जागतिक कुस्ती महिना' म्हणून ओळखला जातो. या महिन्यात विविध कार्यक्रम आणि उपक्रमांच्या माध्यमातून कुस्तीच्या विविध प्रकारांचा प्रचार आणि प्रसार केला जातो. आज, २३ मे २०२५, शुक्रवार, आपण जागतिक कुस्ती दिवस साजरा करत आहोत. या निमित्ताने आपण कुस्तीच्या परंपरेचा सन्मान करूया आणि या खेळाच्या माध्यमातून शिस्त, ताकद आणि सन्मान यांसारख्या मूल्यांना प्रोत्साहन देऊया असे मत बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले आहे.

कुस्ती हा एक प्राचीन आणि लोकप्रिय मैदानी खेळ आहे. हा खेळ दोन प्रतिस्पर्ध्यांमध्ये खेळला जातो, ज्यामध्ये प्रत्येक खेळाडू दुसऱ्याला जमिनीवर पाडण्याचा आणि त्याला नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतो. हा खेळ केवळ ताकदावर नाही, तर तंत्र, चपळता, मानसिक स्थैर्य आणि रणनीतीवर आधारित असतो असे बाजीराव ढाकणे यांनी सांगितले.

# गुरुमाऊली कॉलेज ऑफ नर्सिंग येथे जागतिक परिचारिका दिन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान समारंभ संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

संपूर्ण जगामध्ये स्वास्थ्य व्यवस्थेतील परिचारिकांचे उल्लेखनीय महत्त्व व अतुल्य योगदान याची दखल घेण्यासाठी इसवी सन १८५४ पासून जागतिक परिचारिका दिन हा साजरा करण्यात येतो. यावर्षी गुरुमाऊली कॉलेज ऑफ नर्सिंग माजलगाव येथे जागतिक परिचारिका दिन, शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना या विशेष दिनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले गेले यामध्ये विद्यार्थ्यांना मान्यवरांचे अनमोल मार्गदर्शन लाभले तसेच त्यानिमित्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाद्वारे घेण्यात येणाऱ्या बीएससी नर्सिंग च्या प्रथम वर्षाच्या प्रथम सत्र परीक्षेचा




निकाल नुकताच लागला या मधे महाविद्यालयाच्या ७५ टक्के निकाल लागला व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. अभ्यासक्रमाच्या पहिल्याच वर्षी कठीण परिस्थितीशी सामना करत ध्येय आणि चिकाटीच्या जोरावर विशेष प्राविण्य घेत अनुक्रमे प्रथम क्रमांक निकिता राठोड द्वितीय क्रमांक आकांक्षा भालेराव तृतीय क्रमांक आरती नागरगोजे या विद्यार्थ्यांना विशेष सन्मान करण्यात आला या कार्यक्रमासाठी गुरुकृपा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ.यशवंतराजे भोसले प्राचार्य निर्मला मॅडम फार्मसी प्राचार्य अमित बिंदू सर उपप्राचार्या पूनम खानापूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्री.विनय आनंदराव महाले यांना पीएच.डी. प्रदान

**कन्नड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने श्री. विनय आनंदराव महाले यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. श्री. विनय महाले यांनी विवेकानंद महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातील प्रोफेसर डॉ. आर. जी. दोरीक यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला होता. त्यांनी आपल्या संशोधन प्रबंधामध्ये कॅरॅक्टरायझेशन स्टडीज ऑफ सम नॅनोक्रिस्टलिन सबस्टिट्यूटेड स्पिनेल फेराइट सिस्टिम्स Characterization Studies of Some Nanocrystalline Substituted Spinel Ferrite Systems याविषयावर संशोधनात्मक अभ्यास केला त्यासाठी विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. पदवी बहाल केली आहे.या संशोधन कार्यात प्रो. डॉ. के. एम. जाधव, माजी विभाग प्रमुख, भौतिकशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

श्री. विनय महाले हे कन्नड तालुक्यातील सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ. ए. के. महाले साहेब औराळकर यांचे चिरंजीव आहेत. या यशाबद्दल विवेकानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्रीमंतरावजी शिसोदे , प्रचार्य डॉ. दादाराव शेंगुळे ,डॉ.रुपेश मोरे यांनी अभिनंदन केले .तसेच विविध स्तरांतील मान्यवरांकडून शुभेच्छा मिळत आहेत.

# श्री तपोनिधी पंचायती आनंद आखाडा च्या 'धर्माचार्य' पदी श्रीहरी महाराज पवार यांच्या नावाची घोषणा

## महंत गणेशानंद सरस्वती महाराज, अमृताश्रम स्वामी महाराज यांनी केली घोषणा

**बीड । प्रतिनिधी**

महंत गणेशानंद सरस्वती महाराज (सचिव,श्री तपोनिधी पंचायती आनंद आखाडा ) यांच्या नेतृत्वाखाली व अमृताश्रम स्वामी महाराज (श्री क्षेत्र नवगण राजुरी) यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.ह.भ.प.गुरुवर्य श्रीहरी महाराज पवार (श्री क्षेत्र दत्त संस्थान,कोल्हारवाडी फाटा,बार्शी रोड,बीड चे विद्यमान मठाधिपती) यांना आखाड्याचे धर्माचार्य पद घोषित करण्यात आले आहे येणारया २०२७ च्या कुंभमेळ्याच्या अगोदर महाराजांना पद बहाल करण्याचा भव्यदिव्य कार्यक्रम आखाड्याच्या वतिने आयोजित करण्यात येणार आहे.

श्री तपोनिधी पंचायती आनंद आखाडा (प्रयाग,हरिव्दार,उज्जैन, त्र्यंबकेश्वर) भारतातील १३ आखाड्यापैकी एक व महाराष्ट्रातील एकमेव आखाडा आहे या आखाड्याच्या मार्गदर्शनाखाली १९६८, १९८०, २००३ आणि २०१५ सालचे त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळे संपन्न झालेले आहेत व येणारा २०२७ चा कुंभमेळा संपन्न होणार आहे...या आखाड्याच्या वतिने गुरुवर्य श्रीहरी महाराज पवार यांच्या सर्व धार्मिक कार्यांची दखल घेऊन सर्व संत महंतांच्या उपस्थितीमध्ये धर्माचार्य पद घोषित केले यावेळी महंत



गणेशानंद सरस्वती महाराज,अमृताश्रम स्वामी महाराज,शिवानंद स्वामी महाराज, आदित्य स्वामी महाराज,औदषानंद स्वामी महाराज, नवनाथ महाराज व इतर भक्तमंडळी उपस्थित होते,लवकरच कार्यक्रम आयोजित करून पद बहाल केले जाणार आहे अशी माहिती अमृताश्रम स्वामी महाराज यांनी दिली आहे

आज माझ्या लोककल्याणकारी कामाची पावती मिळाली,अशीच सेवा कायम संस्थान व आखाड्याच्या माध्यमातून माझ्याकडून होत राहो अशी भावना श्रीहरी महाराज पवार यांनी व्यक्त करून सर्व साधु-संत-महंताचे आभार मानले.

# सिंधुदुर्ग सुपूत्र सदानंद करंदीकर यांचे दातृत्व; वीस लाखांचा निधी मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द

**• पंतप्रधान, मुख्यमंत्री सहायता निधीसाठी योगदान**

**मुंबई । प्रतिनिधी**

डोंबिवलीतून लोकलने व पुढे बसचा प्रवास करुन ते मंत्रालयात आले... आणि त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दहा लाखांचे दोन धनादेश सुपूर्द केले. पंतप्रधान निधी आणि मुख्यमंत्री सहायता निधीसाठी त्यांनी वीस लाखांची रक्कम समर्पित केली. सदानंद विष्णू करंदीकर असे या दानशूर सिंधुदुर्ग सुपुत्राचे नाव. श्री. करंदीकर मुळचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आचरा येथील आहे. आयुष्यभराची कमाई समाजासाठी समर्पित करताना श्री. करंदीकर यांनी ना कुठला गाजावाजा केला, न कुठली अपेक्षा ठेवली. त्यांच्या या दातृत्वाला मुख्यमंत्री श्री. फडणवीस आणि उपस्थित उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दाद दिली. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी कृतज्ञतापूर्वक हे धनादेश स्वीकारले. तसेच श्री. करंदीकर यांच्या संवेदनशीलता आणि दातृत्वाला नमन केले.

सदानंद करंदीकर हे खाजगी कंपनीतून निवृत्त झाले. त्यांच्या पत्नी श्रीमती सुमती करंदीकर शासकीय सेवेतून निवृत्त झाल्या होत्या. हे दोघेही नेरुळमधील आनंद वृद्धाश्रमात रहात असत. गतवर्षी ऑगस्टमध्ये करंदीकर यांच्या पत्नीचा कर्करोगाने मृत्यू झाला. कर्करोगग्रस्तांच्या नातेवाईकांची धावपळ आणि पैशांसाठी करावी लागणारी धडपड सदानंद करंदीकर जवळून पाहिली. त्यामुळे त्यांनी पत्नीच्या स्मरणार्थ आपल्या कमाईतील मोठा भाग समाजालाच परत करण्याचा निर्णय घेतला. म्हणूनच अध्यात्मात आणि शेतीत रस असलेले सदानंद करंदीकर यांनी मंत्रालयाकडे धाव घेतली. त्यांनी मुख्यमंत्री सहायता निधीला १० लाख आणि पंतप्रधान सहायता निधीला १० लाख असा एकूण २० लाख रुपयांच्या निधीचे धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केले.

सदानंद करंदीकर ८२ वर्षांचे आहेत. सध्या ते बहिण प्रभा श्रीराम शितूत यांच्याकडे राहतात. वृध्दाश्रम, कर्करोगग्रस्तांच्या कुटुंबीयांची धावपळ यांचा अनुभव गाठीशी असणाऱ्या सिंधुदुर्ग सुपूत्र श्री. सदानंद करंदीकर यांनी सागरा प्रमाणेच समाजाच्या ऋणातून उतराई होण्यासाठीचे आपले दातृत्वही अमर्याद असल्याचे सिद्ध केल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

# संस्था गुणवंताच्या दारी उपक्रमांतर्गत दहावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ बीड संचलित,राजर्षी शाहू कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींनी दहावी बोर्ड परीक्षेत यशाची परंपरा कायम ठेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. फेब्रू. मार्च -२५ झालेल्या परीक्षेत विद्यालयातील विशेष प्राविण्यामध्ये ७९ विद्यार्थिनी ,प्रथम श्रेणी १४ विद्यार्थिनी, द्वितीय श्रेणी ०४ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत. शाळेचा एकूण निकाल १००% लागला. जूजगव्हाण, काळेगाव, ढेकनमोहा, घाटसावळी, मौजवाडी, मौज, बाभूळखुंटा, काटे- वस्ती



,पांगरबावडी, पिंपळगाव-मोची, वायभटवाडी, बीड या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील, संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके, संस्थेचे संचालक प्राचार्य ए. आर. डंबरे ,मु.अ. जी.एस. झोडगे, मु.अ.आर.टी.राऊत व शिक्षक वृंदांनी सदरील गावात जाऊन विद्यार्थिनीचा सत्कार केला. तसेच ९०% पेक्षा जास्त मार्क घेणार्या विद्यार्थिनी २७आहेत.सर्व गुणवंत विद्यार्थिनीचे संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

दैनिक मराठवाडा पत्र
● epaper.marathwadapatra.com
शनिवार, दि.२४ मे २०२५ पान ४

## ‘अ‍ॅग्रिस्टॅक’ अंतर्गत पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी बंधनकारक

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या जमाबंदी आयुक्तालय आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक व वेळेवर मिळवून देण्यासाठी ’अ‍ॅग्रिस्टॅक’ योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांची व त्यांच्या शेतांची माहिती संकलित करणे आणि त्या माहितीच्या आधारे सरकारी योजनांचे कार्यान्वयन अधिक प्रभावी व सुलभ बनवणे आहे. राज्यातील कृषिक्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलदगतीने व परिणाम कारकरीत्या शेतकऱ्यांना लाभ देणे सुलभ व्हावे, याकरिता केंद्र शासनाची ऑग्रिस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी बंधनकारक ▶▶ उर्वरित पान २ वर

# मराठवाड्यात 'सस्ती अदालत' ठरतेय परिणामकारक

## विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या संकल्पनेला मोठा प्रतिसाद - बीड जिल्ह्यात एकाच दिवशी ५९ रस्ते मोकळे

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या संकल्पनेतून कमी खर्चात आणि कमी वेळात शेतकऱ्यांचे रस्ते मोकळे करून देण्याची सस्ती अदालत योजना परिणाम कारक ठरत आहे . दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी सस्ती अदालत संकल्पना राबविण्याचा उपक्रम विभागीय आयुक्त यांनी सुरू केला.



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले आहेत . नुकताच त्यांनी दोनशे रुपयात शेताच्या हद्दीची मोजणी करता येईल असा निर्णय घेतलेला आहे . शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टिकोनातून गुरुवारी विभागातील आठही जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी , उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांची दूरदृष्यप्रणालीद्वारे विभागीय आयुक्त यांनी बैठक घेतली . शुक्रवारी सकाळी दहा ते एक या कालावधीत छत्रपती संभाजीनगर विभागामधील सर्व तालुक्यात सस्ती अदालत योजना राबविण्याचे त्यांनी निर्देश दिले . त्यानुसार वेगवेगळ्या तालुक्यात कुठे तालुकास्तरावर सस्ती आदालत योजना राबविण्यात आली तर कुठे तहसीलदार थेट बांधावर गेले ; कुठे नायब तहसीलदार गेले तर कुठे मंडळाधिकाऱ्यांनी रस्ते मोकळे करून दिले . अशाप्रकारे छत्रपती संभाजीनगर विभागातील महसूल विभागाने अनेक रस्ते मोकळे केले.

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी सुद्धा कालपासून सर्व तहसीलदार व अधिनस्त स्टाफला योजनेविषयी प्रोत्साहित केले . शेतकऱ्यांच्या हिताची असलेली ही योजना खूप सुटसुटीत आणि प्रभावी ठरत आहे.

शुक्रवार ( दि १३ ) रोजी बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यात सम ुपदेशनाद्वारे पाच रस्ते , मामलदार कोर्ट अधिनियमानुसार २१ रस्ते तर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम १४३ नुसार ३३ रस्ते असे एकूण ५९ रस्ते खुले करण्यात आले . बहुदा इतिहासातील ही पहिलीच वेळ असावी की एकाच दिवशी इतके रस्ते खुले झाले.

काय आहे सस्ती अदालत योजना : शेतकऱ्यांना रस्ता मोकळा करून घ्यायचा असेल किंवा नव्या रस्त्याची मागणी करायची असेल तर तहसील कार्यालयास अर्ज द्यावा लागतो . त्यानंतर तहसील कार्यालयातून मंडळ अधिकारी , तलाठी यांना स्थळपाहणीसाठी पाठवण्यात येते . त्यासाठी पत्र काढणे , पत्र तामील होणे , प्रत्यक्षात स्थळ पाहणी होणे यास बराच विलंब होतो . त्यानंतर प्रकरण सुनावणीसाठी तहसीलदार अथवा नायब तहसीलदार यांच्याकडे येते . ज्यास रस्ता हवा आहे त्या शेतकऱ्यास वकिलामार्फत अथवा स्वतः मार्फत बाजू मांडावी लागते . दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर तहसीलदार अथवा नायब तहसीलदार निर्णय देतात . यासाठी वकिलाचा खर्च , कागदपत्रांचा खर्च , येण्या-जाण्याचा खर्च इत्यादी बाबींवर मोठ्या प्रमाणात खर्च होतो . या सर्व बाबींना फाटा देत , अर्जदार , गैरअर्जदार यांच्याशी सल्लामसलत करून, ▶▶ उर्वरित पान २ वर

## शेतकऱ्यांची खते व बियाणे साठी 'लिंकिंग'द्वारे होणारी लूट तात्काळ थांबवा : उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

ऐन खरीपाच्या तोंडावर बीड जिल्ह्यात डीएपी खत व सोयाबीन, कपाशीच्या बियाणांची शेतकऱ्या कडून मागणी वाढताच खात व बियाणे बाजारातून गायब झाले असून यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहे. ऐन पेरणी हंगामात शेतकऱ्यांना वेठीस धरल्यास त्यांना त्यांची जागा दाखवून देऊ असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात



एकीकडे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार जिल्ह्यात मुबलक प्रमाणात खते व बियाणे उपलब्ध असल्याचे सांगतात, मग मुबलक प्रमाणात उपलब्ध असताना ते शेतकऱ्यांना का मिळत नाही ? बीड जिल्ह्यात खरीप पेरणी जवळ आली असतानाच डीएपी खताची आवक कमी झाल्याचे सांगत शेतकऱ्यांना डीएपी खतासोबत व कपाशीच्या काही नामांकित बियाणेवर इतर गरज नसलेल्या खताची व बियाणे ची लिंकिंग केल्या जात आहे. यामुळे आधीच नापिकी आणि अवकाळी ने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना जास्तीचे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. या बाबतीत शासनाचा कृषी विभाग अजूनही झोपेत असून कृषी विभागाचे भरारी पथक काय करत आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

## शैक्षणीक व्हीडीओ निर्मीती स्पर्धेत धन्वे बापु तालुक्यात प्रथम; सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्या मार्फत घेण्यातआलेल्या शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेमध्ये वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचोटी येथील आदर्श उपक्रम शील तंत्रस्नेही शिक्षक कवी धन्वे बापू यांचा ६ वी ते ८ वी इंग्रजी



व्याकरण या विषयातील व्हिडिओ तालुक्यातून प्रथम आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे .

याबाबत अधिक माहिती अशी की महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यामार्फत राज्यस्तरावर घेण्यात आलेल्या शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा वर्ष २०२३-२४ घेण्यात आली होती त्यामध्ये राज्यभरातून अनेक शिक्षक ▶▶ उर्वरित पान २ वर

## भोगवटा धारकांना मालकी हक्क देऊन त्यांना न्याय मिळवून देणार: राजकिशोर मोदी

### अंबाजोगाई : भोगवटा धारकांच्या नोंदी मालकीमध्ये घेवून मालकीच्या पीटीआर देण्याच्या मागणीचे राजकिशोर मोदी यांचे जिल्हाधिकारी याना निवेदन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरात अनेक ठिकाणी नवीन वस्त्या त्याचबरोबर काही जागांवर अतिक्रमण करून अनेक वर्षे पासून शेकडो कुटुंब भोगवट्यामध्ये



रहात आहेत. अशा कुटुंबाना म ालकीमध्ये घेऊन त्यांना त्यांच्या म ालकीच्या पिटीआर द्याव्यात अशी मागणी अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. शहरातील विविध वस्त्याम धील भोगवटा धारकांना मालकीत घेऊन त्यांना त्यांचा हक्क व न्याय मिळवून देणार असल्याचे

▶▶ उर्वरित पान २ वर

## जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट अवसायकाची नियुक्ती; संघर्ष कृती समितीच्या प्रयत्नाला यश

### संचालकांच्या मालमत्ता जप्ती साठी पोलीसांनी सहकार्य करावे - मारुती तिपाले

**बीड । प्रतिनिधी**

सहकार आयुक्त महाराष्ट्र पुणे यांच्या शिफारसीनुसार मुख्य रजिस्टार भारत सरकार यांनी जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट करिता माजलगाव तालुका सब रजिस्टार यांची अवसायक पदी नियुक्ती केली असुन तसा आदेश पारीत केला आहे. अशी माहिती संघर्ष कृती समितीच्या वतीने मारुती तिपाले यांनी दिली आहे.

जिजाऊ मासाहेब मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीने २०२३ दोनशे कोटी ठेव रकमेचा घोटाळा करून हजारो ठेवीदारांना गंडवले. अशोकराव हिंगे यांच्या म ार्गदर्शनाखाली ठेवीदार संघर्ष कृती समितीच्या वतीने पाठपुरावा चालू आहे. यापूर्वीच राज्य शासनाने एमपीआयडी प्रस्तावाला मंजूरी दिली. प्रस्तावातील मालमत्ता जप्तीची कारवाई एसडीएम मार्फत चालू आहे. परंतु अद्याप आरोपी संचालकांच्या मालमत्ता जप्त केलेल्या नाहीत. यामुळे हा प्रस्ताव अपुर्ण आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्ह्यातील शेतकरी वर्गाने शासकीय योजनेसाठी फॉर्मर आयडी तात्काळ काढून घ्यावा :अनिल बोर्डे

**गेवराई । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांनी अद्याप पर्यंत फॉर्मर आयडी काढलेला नाही असे निदर्शनास येत आहे. भविष्यात शासकीय विविध योजनांचा शेतकऱ्यांना लाभ घेण्यासाठी फॉर्मर आयडी अनिवार्य केलेला आहे. त्याशिवाय विविध योजनेचा लाभ मिळणार नाही



याबाबत शासन स्तरावर व विविध लोकप्रतिनिधी यांनी व बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र शाखेने याबाबत आपणास जाहीर पत्रका द्वारे अवगत केलेले आहे.

परंतु अद्याप पर्यंत बहुसंख्य शेतकरी वर्गाने या बाबीकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास येत आहे. तरी नजीकच्या शासकीय सेवा केंद्रातून फॉर्मर आयडी ओळखपत्र काढणे अत्यंत आवश्यक आहे असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष व गेवराई ग्राहक मार्गदर्शन केंद्र प्रमुख अनिल बोर्डे यांनी केले आहे. त्याशिवाय पुढील काळात शासनाच्या विविध लाभदायक विमा योजना, पीएम किसान योजना, नैसर्गिक आपत्ती अनुदान, पिक कर्ज इतर शासकीय ▶▶ उर्वरित पान २ वर



*एसटी सीसीएस बँकेच्या एसटी कामगार संघटना व एसटी कामगार सेना यांचे अधिकृत उमेदवार श्री गणेश चव्हाण यांची संचालक पदावर निवडून आल्या बद्दल त्यांचे शिवसेना कार्यालयावर जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम व उपजिल्हाप्रमुख राजाभाऊ महूवाले व विधानसभा प्रमुख सुशील भैय्या पिंगळे इतर पदाधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी एसटी कामगार सेनेचे विभागीय सचिव राहुल बहीर ,हावळे पाटील ,सय्यद ख्वाजा,तसेच कामगार संघटनेचे वल्लभ चिरके,नितीन रसाळ,विजय कुडके व इतर एसटी कर्मचारी हजर होते.*

## बीडच्या शिक्षण विभागात 500 कोटींचा घोटाळा? शिक्षणाधिकारी चौकशीच्या फेऱ्यात

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात मागील अनेक दिवसांपासून प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण विभागात शिक्षण भरतीमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष सादिक इनामदार यांनी केला आहे. याबाबत त्यांनी राज्याच्या शिक्षण मंत्र्याकडं तक्रार केली आहे. यामध्ये जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी आणि माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी यांनी मोठा भ्रष्टाचार केल्याचा आरोप सादिक इनामदार यांनी केली आहे. नागपूरमध्ये शिक्षक भरती प्रकरणी चौकशी सुरू आहे. यासोबत बीड जिल्ह्यातही शिक्षक भरतीमध्ये खासगी संस्थाचालक आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमतानं कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचं पाहायला मिळत आहे, असा आरोप त्यांनी केलाय.

सादिक इनामदार यांना जीवे मारण्याची धमकी : मला जीवे मारण्याची धमकी दिली आहे. माझ्या जीवाला धोका आहे. मला काही बरे वाईट झाल्यास जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी भगवान फुलारी आणि ज्या खासगी संस्थेत भ्रष्टाचार झाला. हे या घटनेस जबाबदार राहतील, असं सादिक इनामदार यांनी म्हटलय.

पदाचा गैरवापर करत केली शासनाची फसवणूक : उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी शिक्षण अधिकारी प्राथमिक आणि माध्यमिक यांना शासनाच्या नियमानुसार शासनाच्या अधीन राहून शिक्षक भरती संदर्भात आपल्या स्तरावर निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. परंतु, त्यांनी असं न करता पदाचा गैरवापर करून शासनाची फसवणूक करत करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. संस्था चालकांना कोट्यवधी रुपयांचे थकीत वेतन वितरित करून शिक्षक भरती घोटाळा आणि खासगी शिक्षण संस्थेमधून विनाअनुदानित शिक्षकांना देयके दिली आहेत, असाही आरोप त्यांनी केलाय.

माहिती देण्यास दिला नकार : माहिती अधिकारामध्ये मागवलेली माहिती १४ मे ला कार्यालयात देतो, अशी माहिती मला कार्यालयातील लिपीक यांनी फोनवरून दिली. यानंतर मी कार्यालयात गेल्यावर मला माहिती अधिकारामध्ये मागवलेली माहिती देण्यास नकार दिला. यावेळी लिपीक यांनी सांगितलं की, शिक्षण अधिकारी भगवान फ ुलारी यांनी सादिक इनामदार यांना माहिती देऊ नका असं सांगितलं आहे, असं सादिक इनामदार यांनी सांगितलं.

शिक्षण विभागानं दिले अधिकाऱ्यांच्या चौकशीचे आदेश : बीड जिल्ह्यातही प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण विभागात शिक्षक भरतीत मोठ्या प्रमाणावर घोटाळा झाल्याचे आरोप होत आहेत. याबाबत भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष सादिक इनामदार यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

## मिनाक्षीताई देवकते यांना अहिल्यारत्न पुरस्कार जाहीर



**वडवणी । प्रतिनिधी**

येथील बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष मीनाक्षीताई देवकते / डोमाळे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन ए. डी. फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा महाराष्ट्र रत्न पुरस्कार जाहीर करण्यात ▶▶ उर्वरित पान २

